९६६
म. ग्रं. सं. ठाणें
चरित्र
९३८८

# प्रियदर्शिनी

# इंदिरा



REFBK-0015254

# प्रियदर्शिनी इंदिरा

भारताच्या नव्या पंतप्रधान

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों. दि. ........

: लेखक :

दत्ता. जी. कुलकर्णी, M. A.

दा. क. ९५२४८

नलिनी प्रकाशन पुणे

REFBK-0015254

नलिनी प्रकाशन क्रमांक अकरा

—

प्रकाशक :

कै. नलिनी,
नलिनी प्रकाशन,
२९ कसबा, पुणें ११.

—

मुद्रक :

शा. चं. आगाशे बी. ए.
श्री शिवाजी प्रिंटिंग वर्क्स
४९५-४९६ शनिवार
पुणे २

—

चित्रकार अनंत सालकर.

यांतील ब्लॉक्स
दैनिक सकाळच्या सौजन्यानें.

© सर्व हक्क लेखकाकडे.

—

प्रथमावृत्ती : फेब्रुवारी १९६६

# चरित्राची पाने

१ वारसा.
२. आनंद भवन.
३ मातपिता.
४. जन्म.
५. बालपण.
६. वानरसेना.
७. शिक्षण.
८. आईचा आजार.
९. एकाकी जवाहर.
१०. तुरुंगातील पत्रे.
११. शिक्षण आणि स्वातंत्र्य-लढा.
१२. तारुण्य आणि प्रेम.
१३. अधिवेशनाची जबाबदारी.
१४. बेचाळीसची मुंबई काँग्रेस आणि तुरुंगवास.
१५. सत्तेचाळीसचे स्वातंत्र्य आणि नंतर.
१६. केरळातील कामगिरी.
१७. महाराष्ट्राचा दौरा.
१८ जवाहरलालजींचा सत्तरावा वाढदिवस आणि केनेडी-भेट
१९. वैवाहिक जीवनाची सांगता.
२०. राजकारणापासून दूर.
२१. नेहरू नंतर कोण ?
२२. लालबहादूर शास्त्री.
२३. ६४ चा प्रजासत्ताक दिन.
२४. इंदिराजी व शास्त्रीजी.
२५. कर्तृत्वाची ओळख.
२६. गुणांचा गौरव.
२७. नेतेपदी निवड.
२८. निवडी नंतर.
२९ निवडीची प्रतिक्रिया.
३०. मंत्रिमंळाचा बिकट प्रश्न
३१. नवे मंत्रिमंडळ.

# ओळख

भारताच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांचा जीवन परिचय करून देणारे हे छोटेसे पुस्तक वाचकांना उद्‌बोधक आणि उपयुक्त वाटल्याशिवाय रहाणार नाही छोट्या इंदिरेपासून तो महामंत्री इंदिराजीं-पर्यंत गेल्या ४८ वर्षात जे काही विशेष घडले, नवलाचे घडले त्याची सुरेख वेचणी आणि आकर्षक मांडणी करून ग्रंथकर्त्यांनी वाचकांपुढे चरित्र नायिका हुबेहूब उभी केली आहे.

इंदिराजींना जवळून पाहण्याची, त्यांच्या सहवासात रहाण्याची ज्यांना ज्यांना संधी लाभली असेल त्यांचेवर बाईंच्या वैशिष्ठ्याचा ठसा कायमचा उमटल्याशिवाय राहिला नसेल. अशांपैकी मी एक भाग्यवान महाराष्ट्रीय आहे. १९५९ मध्ये त्यांनी जेव्हा काँग्रेसच्या अध्यक्ष या नात्याने महाराष्ट्राचा दौरा केला तेव्हा तीन--चार दिवस आणि १९६२ च्या सार्वत्रिक निवडणुकीचे वेळी दोन तीन दिवस मी त्यांचेबरोबर होतो. या काळात त्यांचेबरोबर मी प्रवास केला, चहा घेतला, जेवण घेतले, मुक्काम केला. मुक्कामात गप्पा-गोष्टी आणि चर्चाही केली. त्यावेळी त्यांच्या साधेपणाचा विनयाचा निगर्वी स्वभावाचा, सेवाभावाचा, त्यागवृत्तीचा आणि उत्कट देशभक्तीचा जो ठसा माझ्या मनावर उमटला तो अद्याप कायम आहे. बाईंनी आजोबांचे, आईचे आणि पित्याचे सारे चांगले गुण उचलले असून दोष शक्यतो टाळण्याची खबरदारी घेतली आहे. बाईमाणूस असूनही आपण काही कमी नाही हा त्यांचे ठायी असलेला आत्मविश्वास त्यांना काँग्रेसच्या अध्यक्ष व पंतप्रधान बनण्यास कारणीभूत झाला आहे.

चार वर्षानंतर परवा दिल्लीत पंतप्रधान निवडीच्या धामधुमीतही त्यांनी दोन मिनिटे भेट देऊन मला आठवणीचा जो धक्का दिला तो विशेष होता नव्या विचारांच्या नव्या आशा-आकांक्षा-उमेदीच्या त्या प्रतीक असून तरुण पिढीच्या स्फूर्तीस्थान बनल्या आहेत. अशा या श्रेष्ठ भारतीय महिलेचे चरित्र त्वरित प्रसिद्ध करण्यात लेखक प्रकाशकांनी मोलाची कामगिरी बजावली आहे.

संपादक, विशाल सह्याद्रि, पुणे.
दि. ७-२-१९६६

अ. वि. पाटील



## १ वारसा

प्रियदर्शिनी इंदिरा ज्या घराण्यात जन्मली.ते नेहरू घराणे मुळचे काश्मीर मधील होय. अठराव्या शतकाच्या प्रारंभाला काश्मीरमधून त्यांचे पूर्वज नांव आणि पैसा कमावण्याच्या इच्छेने दिल्लीकडे वळाले होते.

त्या वेळी औरंगजेबाचा मृत्यू झाला होता. मोगलांच्या वारसाबद्दल दिल्लीला अनेक कट शिजू लागले होते. इकडे महाराष्ट्रात त्या वेळी मराठ्यांचे राज्य डळमळीत अवस्थेतून मराठी मनाच्या खंबीर प्रयत्नाने, संताजी धनाजीच्या घोडदौडीत स्वामीनिष्ठेची धूळ उधळीत गगनाला गवसणी घालण्याची स्वप्ने पाहू लागले होते.

इंदिराजींच्या पूर्वजांचे नाव राजकौल होय. ते संस्कृत आणि पारशी भाषेचे पंडित होते. १७४६ च्या दरम्यान राजकौल दिल्लीला आले असावेत. ते एका कालव्याकाठी रहात असत. **हिंदी भाषेत – कालव्याला नहर असे म्हणतात**. नहर काठी रहाणारे ते नेहरू, असे जे त्यांचे आडनाव पडले ते कायमचे!

या प्रसिद्ध नेहरू घराण्यात इंदिराजींचे आजोबा वकिली करीत असत. त्यांच्या अजोबांचे नांव प्रत्येकालाच माहित आहे–मोतीलाल नेहरू! यांनी कानपूर आणि अलाहाबाद कोर्टात वकिली केली. त्यांचा भाऊही यशस्वी वकील होता. खूप पैसा मिळवावा हे त्याचे प्रथम ध्येय होते. पण ते तितकेच चैनी व विलासी होते. मोठमोठ्या मल्लांच्या कुस्त्या लावण्याची त्यांना मोठी आवड होती. प्रथम प्रथम त्यांचे सार्वजनिक कार्याकडे फारसे लक्ष नव्हते; परंतु पाश्चात्य आचार-विचार मनावर जरी ठसले होते तरी गंगेचे पाणी त्यांच्या रक्तात अजून भारतीय संस्कार जागवीत होते. अशा या मोतीलालजींची इंदिरा ही नात होय.

प्रियदर्शिनी इंदिरेचे पिताजी जवाहरलाल ह्यांचे बालपण मोठ्या विलासात आणि स्वतंत्र विचारसरणीच्या वादात गेले.

दा. क्र. १५२५४

## २ आनंद भवन

आज जे आनंद भवन जगात गाजत आहे ते मोतीलालजींनी इंदिरेचे वडील जवाहरलाल दहा वर्षाचे असताना बांधले होते. ह्या घराभोवती मोठी बाग व पोहोण्यासाठी तलाव आहे. हीच ती जागा जेथे इंदिरेच्या बालपणाचा काही काळ गेला आणि आज तर ही जागा कॉंग्रेसच्या विचारसरणीने काम करणाऱ्या लोकांचे जणू पंढरपूर झाले आहे.

इंदिरेच्या आजोबांनी आपल्या विलासी जीवनाचा त्याग करून राष्ट्रीय जीवनाचें कडक व्रत जे एकदा स्वीकारले ते आमरण पाळले. इंग्रजीत एक म्हण आहे दानधर्माला सुरवात घरापासून करावी. मी असे म्हणेन देशभक्तीला सुरवात घरापासून करावी. दुसऱ्याला उपदेशाचे डोस पाजण्यापूर्वी जर प्रत्येक देशभक्त आपल्या घरापासून देशभक्तीला सुरवात करील तर......? तर नेहरू घराण्यासारखी तेजस्वी परंपरा तो निर्माण करू शकेल! इंदिरा म्हणजे नेहरू घराण्याच्या देशभक्तीचा ज्वलंत वारसा होय. हा वारसा मोतीलालजींनी जवाहरलालजींना दिला. नुसता दिला नाही, तर आधी केले मग सांगितले या न्यायाने त्यांनी विलासात वाढविलेल्या आपल्या मुलाला देशाच्यासाठी विलासाची कात टाकून तेजस्वी व्हायला शिकविले.

जवाहरलालजींची ही कन्या केवळ जवाहरासारखी नाही. तिच्यात नेहरू घराण्याचे अनेक पारंपारिक गुण--अवगुण एकत्रित झालेले आहेत.

## ३ माता पिता

नेहरू घराण्याशी १९१६ साली आणखी एका स्त्रीचे भाग्य बांधले गेले. वसंत पंचमीचा तो दिवस होता. नवजीवनाला सुरवात सूचक तो दिवस होता. त्या वेळी जवाहरलालजींचे वय २६ वर्षांचे होते व नेहरू घराण्याशी नवीन संबंध जोडणाऱ्या मुलीचे वय अवघे १७ वर्षांचे होते. दिल्ली शहरात मोठ्या थाटामाटात जवाहरलालजींचा कोमल कमलेशी विवाह झाला होता. पण—

त्या दोघांच्या भाव-विश्वातही अंतर होते. नेहरूंच्या शब्दात सांगायचे झाले तर, " या नाजूक आणि भावनामय मुलीचे मन एखाद्या सुकुमार फुलाप्रमाणे पाकळी पाकळीने उमलत आहे. फार स्नेहाने आणि दक्षतेने त्याची निगा राखली पाहिजे हे माझ्या लक्षात आले नाही. आम्ही परस्पराकडे आकर्षित होत होतो आणि आमचा जीवनक्रमही व्यवस्थितपणे चालला होता, परंतु दोघांच्या मनाची पार्श्वभूमी असमान असल्यामुळे मनाची गुंफण बेमालूम होत नसे. त्यामुळे कधी कधी खटके उडत. बारीक सारीक गोष्टींवरून रुसणे, फुगणे होत. परंतु ही पोरसवदा भांडणे फार काळ टिकत नसत. तेव्हा समेट घडून येई. आमचे दोघांचेही स्वभाव तिखट होते आणि दोघांचीही अंतःकरणे हळवी होती आणि आमच्या प्रतिष्ठीतपणाच्या कल्पनाही बालिश होत्या. असे असूनसुद्धा आमच्यातील स्नेह गाढ होत चालला. आमच्यातील मानसिक असमानता नष्ट होण्याला मात्र बराच अवधी लागला. लग्न झाल्यानंतर २१ महिन्यानी आमची एकुलती एक मुलगी इंदिरा हीचा जन्म झाला."

## ४ जन्म

इंदिरा गांधींचा जन्म नोव्हेंबर महिन्यात १९ तारखेला १९१७ साली अलाहाबादला झाला. पण विक्रम संवत पद्धतीनें त्यांची जन्मतिथी काढली तर तो २६ आक्टोबर १९१७ ला झाला असें मानावे लागते.

त्या जेव्हा जन्मल्या ते १९१७ साल जगाच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचें होते. रशियात राज्यक्रांती याच वर्षी झाली होती. सामान्य रशियन जनतेला दे माय धरणी ठाय करून टाकणारी झारशाही त्यावर्षी रशियाच्या लोकजीवनात लोप पावली. आणि लेनीनच्या साम्यवादानें त्याच वर्षी रशियन भूमीत मूळ धरले. ह्याचवर्षी भारतातसुद्धा राष्ट्रसभेच्या म्हणजेच कॉंग्रेसच्या अध्यक्षपदावर श्रीमती ॲनी बेझंट यांची निवड झाली होती.

त्या छोट्या पहिल्या वहिल्या आपत्त्याला पाहिल्यावर मूलवेडे चाचा नेहरू म्हणाले होते, “ प्रियदर्शिनी ! ”

इंदिरा गांधींचे नेहरूंनी ठेवलेले हे सार्थ आणि यथार्थ नाव होय. याच नावाने त्यांनी आपली अमरपत्रे लिहिण्यास सुरुवात केली होती.

जवाहरलालांना पुत्रीप्राप्तीचा आनंद सामान्य माणसासारखा फार काळ घरांत राहून भोगता आला नाहीं. त्यावेळीं राजकीय चळवळीला भरती आली होती. त्यांचा एक पाय आनंद भुवनात तर दुसरा पाय जेलमध्ये !

## ५ बालपण

मोतीलालजींचे आनंदभुवन हे भारतीय राजकीय नेत्यांच्या आनंदाचें भुवन झाले होते !

तेथे येणाऱ्या प्रत्येक स्वातंत्र्य प्रेमी माणसाला विचार स्वातंत्र्याचा आनंद उपभोगता येत असे, पण त्याच्यावर सरकारी अवकृपा केव्हा होईल हे सांगता येत नसे. आजोबा मोतीलाल नेहरू, आई कमला नेहरू, वडील जवाहरलाल नेहरू या सर्वांनीच भारताच्या स्वातंत्र्य संग्रामात तन-मन-धनाने स्वतःला वाहून घेतले होते. त्यांच्या घरांत केव्हाही पोलीस येत. केव्हाही झडती घेत, आणि हवे त्याला अटक करून घेऊन जात ! ह्या अशा अस्थिर वातावरणात प्रियदर्शिनी इंदिराचे बालपण जात होते. मोठमोठाल्या पुढाऱ्यांचे विचार ती अगदी लहानपणापासून ऐकत असे. गांधीजींना अगदी लहानपणापासून तिने पाहिले होते. त्यांचे विचार लहानपणीं तिने ऐकले होते. कधी कधी तर तेथे जमलेले सर्व 'मोठे' लोक निघून गेले म्हणजे मग इंदिराजी घरातील नोकरांना आनंदभुवनाच्या व्हरांड्यात जमा करीत असे आणि मोठ्या आवेशाने हातवारे करून ती त्यांच्यापुढे भाषण देत असे, नोकर भाषण ऐकून टाळ्या वाजवीत. भाषणाचे बाळकडू हे असे लहानपणीच तिला मिळाले होते.

## ६　　　　वानरसेना

गांधीजींचा सत्याग्रह त्याकाळी ब्रिटिश सरकारचे धाबे दणाणून टाकीत असे ! सत्याग्रहाच्या गोष्टी आनंद भवनात नेहमी चालत. छोटी इंदिरा त्या ऐकत असे. ती बारा तेरा वर्षाची झाली होती. १९३० ची सत्याग्रह चळवळ देशव्यापी करण्याच्या चर्चा ती आनंद भवनात ऐकत असे. गांधीजींच्या या सत्याग्रह चळवळीसाठी तिने लहान मुलांची एक सेना तयार केली. मोठ्यांनी मोठ्या कौतुकाने त्या सेनेला नांव दिले वानरसेना ! ह्या वानरसेनेचा पुढाकार त्यावेळीं इंदिराजींनी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे,
अनुक्रम ........................ ११
क्रमांक ........................



घेतला होता. किंबहुना ह्या वानर सेनेचे नेतृत्व म्हणजे तिच्या राजकीय जीवनाची नांदीच होय !

13

## शिक्षण

जवाहरलाल नेहरूच नव्हे तर त्या काळातील अनेक प्रतिभावान स्त्री-पुरुषांना आपल्या आवडत्या क्षेत्रापासून राजकारणाच्या जोरदार वादळाने आपल्या बरोबर खेचीत नेले आणि अखेरीस मनातील आवडते विषय बाजूला ठेवून देशाचे स्वातंत्र्य आणि त्यासाठी राजकारण हेच त्यांचे प्रमुख कर्तव्य ठरले. आणि आयुष्याच्या शेवटापर्यंत ते राजकारणाच्या प्रवाहातच वहात राहिले. तसेच इंदिराजींचे झाले आहे, असे म्हटले तर ते अतिशयोक्तीचे होणार नाहीं !

घरी अलाहाबादला पोलिसांचा नेहमी ससेमिरा पाठीशो लागलेला त्यामुळें मुलीच्या शिक्षणाला थोडेसुद्धा शांत वातावरण लाभणार नाहीं म्हणून इंदिरेला शिक्षणासाठीं घरापासून दूर ठेवण्यात आले.

वडिलांना त्याकाळी अनेक जेलमधून जीवन कंठावे लागले. पण ते त्यांनीं पचनी पाडले मुलीच्या शिक्षणासाठीं तिला एके ठिकाणीं ठेवावे आणि पुन्हा काहीतरी अडचणींमुळें तेथून तिची उचलबांगडी व्हावी असें तिच्या शिक्षणाच्या बाबतीत झाले.

पुण्यातील प्रसिद्ध हुजूरपागेत शिक्षणाचा काही काळ इंदिरेचा गेला. त्यानंतर काही काळ कै. रविंद्रनाथ टागोरांच्या शांतिनिकेतनामध्ये गेला, तर काही काळ त्यांचा ऑक्सफर्ड विश्वविद्यालयात शिकण्यांत खर्चे झाला, शाळा कॉलेजात असताना त्यांना काव्य, संगीत, चित्रकला आणि शिल्पकला यांची मनापासून आवड होती. काव्यात रममाण होणाऱ्या

नोबेल पारितोषिक विजेते रविंद्रनाथ टागोरांच्या सहवासात त्यांचा शांतिनिकेतनमधील काळ गेला. काव्य जगणाऱ्या आणि काव्यात रममाण होणाऱ्या कवि महर्षि रविंद्रांच्या शिकविण्याचा त्यांच्या मनावर खोल परिणाम झालेला आहे. त्या म्हणतात, "जीवनाशी काव्याचा कांही संबंध नाहीं असें मला प्रथम वाटत होते. पण काव्य, संगीत, कला ह्याशिवाय जीवन संपन्न होत नाहीं, हे टागोरांच्यामुळें मला समजले."

त्यांच्या मनात त्या वेळी आपण लेखिका व्हावे अशी इच्छा होती. कदाचित शांतिनिकेतनमध्ये ऑक्सफर्डला न जाता तशाच आणखी काही काळ त्या राहिल्या असल्या तर त्या कै. सरोजिनी नायडूंप्रमाणे राजकारणात पडण्यापूर्वी निश्चितच भाव-कवि झाल्या असत्या: पण दैवाने दुसरेच योजलेले असल्याने तसे कसे बरे घडेल!

## ८ आईचा आजार

जवाहरलाल आणि कमला ह्या माता-पित्यांचे सारे जीवन– जवळ जवळ १८ वर्षे देशासाठी कष्टण्यात गेले. कोमल कमलाजींवर त्यांचा अनिष्ट परिणाम झाला. प्रियदर्शिनीची आई मुलीचे संगोपन करण्यास, तिच्या शाळेकडे लक्ष देण्यास असमर्थ ठरली. काही वर्षे तुरुंगात व अनेक वर्षे दवाखान्यात त्यांची गेली. वडील सदानकदा ब्रिटिश सरकारच्या रोषाला बळी पडत, थोडीशी मोकळीक मिळते न मिळते तोच त्यांची रवानगी पुन्हा तुरुंगात होत असे. इकडे इंदिरेच्या आईचा आजार वाढतच राहिला.

कणखर मनाच्या कमला नेहरू पतीच्या पावलावर पाऊल टाकून सात पावलांची मिळालेली धर्माची शिकवण मरेपर्यंत पाळत राहिल्या. त्यांची कोमल काया सतत श्रमाचा बोजा पेलूच शकले नाही. अखेरीस

त्यांचा आजार सतत दुर्लक्ष केल्यामुळे वाढतच गेला आणि औषधउपचारासाठी अखेरीस त्यांना विमानाने स्वीत्झर्लंडमध्ये न्यावे लागले. आईकडे लक्ष पुरवण्याची जबाबदारी प्रियदर्शिनी इंदिरेने पत्करली. ती आईबरोबर स्वीत्झर्लंडमध्ये गेली. निष्णात डॉक्टर उपलब्ध वैद्यकीय उपचार करीत होते. इंदिरा आईला हवे नको ते बघत होती. पण जवाहरलालजी इकडे भारतात तुरुंगात होते. पतिपरायण कमलेच्या मनाला ह्या अशा अवस्थेतसुद्धा दुःख होत होते. त्यांचा आजार वाढतच गेला. जाग नेहमी मानसाला उशीरा येते. तेव्हा तिचा काही उपयोग होत नाही. ब्रिटिश सरकारला अशीच उशिरा जाग आली. कमलाजींच्यासाठी त्यांनी जवाहरलालजींना तुरुंगातून मुक्त केले. पण फार उशिर झाला होता. आनंद भुवनातील आनंद जणू कमलाजींच्या रूपाने कायमचाच दूर निघून गेला. आणि जवाहरलालजी तरुण वयात एकाकी बनले.

१५२५४

## ९ एकाकी जवाहर

पत्नीच्या निधनाचा आघात सतत तुरुंगाच्या वाऱ्या करणाऱ्या जवाहरलालजींना फारच जाणवला. ते अधिकच अंतर्मुख बनले, आणि आपला तुरुंगातील वेळ इतिहास वाचनासाठी खर्च करू लागले. सतत वाचन आणि चिंतनाने आणि राजकीय चळवळीतील प्रत्यक्ष अनुभवाने धारदार झालेल्या मनाने कागद पेन्सील सरसावून त्यांनी आपल्या शाळेत शिकणाऱ्या चिमुरड्या तेरा वर्षांच्या प्रियदर्शिनीला म्हणजे इंदिरेला जगाच्या इतिहासाची रुपरेषा समजावून देण्यासाठीं आपले जेलमधून पत्रे लिहिण्याचे कार्य चालूच ठेवले. जगाच्या इतिहासाची त्यांनी त्या पत्रातून केवळ इंदिरेलाच नव्हे तर साऱ्या जगाला जणू पुन्हा नव्याने

ओळख करून दिली. सतत आठ वर्षं ते निरनिराळ्या तुरुंगातून ही पत्रे आपल्या प्रियदर्शिनीला लिहित होते.

माता पिता जीवंत असूनही इंदिरेला शिक्षणासाठी दूरच्या ठिकाणी रहावे लागले. तो राजकीय आंदोलनाचा काळ सामान्य माणसाच्या जीवनालासुद्धां ढवळून काढण्यास समर्थ ठरला. मग जिच्या घरांत इतिहास घडत होता त्या इंदिरेच्या मनावर निश्चितच परिणाम झाला असेल. वानरसेना याच परिणामाचे प्रतीक होय. मग पित्याने पाठविलेल्या त्या ऐतिहासिक पत्रांचा परिणाम इंदिरेवर प्रथम जरी झाला नसेल तरी पुढील आयुष्यात खचितच तो झाला असेल. आपल्या प्रियदर्शनीला जवाहरलाल आपला मुलगाच समजत असतील. सामान्य पालक आपल्या मुलाला जे काही आपल्याजवळ आहे ते देण्याचा आटोकाट प्रयत्न करतो. तो चांगला निघेल अशी त्याला खात्री असते. म्हणून तर तो त्याला घडविण्याचा कशोशीने प्रयत्न करतो. त्यासाठी तो लहानपणापासून जे शक्य असेल ते पुरवितो. मग आपल्या राजकीय आणि कौटुंबिक जीवनाचा वारसा असलेल्या प्रियदर्शिनी इंदिरेविषयी जवाहरलालजींच्या मनात असे काही विचार आले नसतील असे थोडेच आहे ?

## १० तुरुंगातील पत्रे

भारताचे पंतप्रधान कै. जवाहरलाल नेहरूंनी नैनीच्या सेंट्रल जेल मध्ये असताना आपल्या एकुलत्या एक मुलीला तिच्या तेराव्या वाढदिवशी पत्र पाठवले होते. त्या वेळी म्हणजे १९३० साली ते आपल्या तेरा वर्षांच्या मुलीला म्हणतात "लोकांच्या सदिच्छा तुला अनेक मिळतील परंतु नैनी जेलमधून मी तुला कोणती बरे भेट पाठवू ?

माझी भेट प्रत्यक्ष दिसावयास मोठी असणार नाही. ती एखाद्या हावेच्या अस्तित्वाप्रमाणे सूक्ष्म असेल. तिचा संबंध मन आणि आत्मा यांच्याशी असेल. अशी भेट फक्त पत्र्यांच देऊ शकतील. ती भेट प्रत्यक्ष तुरुंगाच्या भिंती आडवूं शकणार नाहीत.''

आपल्या तेरा वर्षाच्या चिमुरड्या मुलीला नेहरुजींनी लिहिलेले हे पत्र म्हणजे त्यांनी लिहिलेल्या जगाच्या इतिहासाचे पहिले पान होय. तेव्हा नेहरू पंतप्रधान नव्हते. भारताच्या भाग्यासाठी स्वतःच्या वैभवाचा होम करून ते आपल्या वडिलांबरोबर राजकारणांत उतरले होते. नेहरूंच्या पत्नी कै. कमला नेहरू यांच्याबाबतीत प्रत्यक्ष नेहरु म्हणतात. "तुला जी आई लाभली ती बहादूर आणि उदार हृदयांची माता आहे. जेव्हां कधी तुझ्या मनात कुठल्याविषयाबद्दल संदेह निर्माण होईल तेव्हा तो आपल्या आईला विचार! तिच्यापेक्षा चांगला मित्र तुला दुसरा कोणी भेटणार नाही बाळ! मी आता तुझा निरोप घेतो. माझी इच्छा आहे कीं, तू मोठी हो! भारताची सेवा करण्यासाठी एक बहादूर शिपाई हो! माझे प्रेम आणि आशीर्वाद तुझ्या पाठीशी आहेत.''

१९३० साली जेलमधून लिहिलेल्या आपल्या पत्रातील नेहरूंचे हे उद्गार आज किती सार्थ झाले आहेत! आपली कन्या भारताची पंतप्रधान झाली हे पाहून कोणत्या मात्या-पित्याचे हृदय उचंबळून येणार नाही?

स्वर्गात कमलानेहरू आणि जवाहरलाल नेहरु दिनांक १९ जानेवारी ६६ ला खरोखरच किती आनंदले असतील, त्यांच्या डोळ्यात आनंदाश्रू आले असतील नाही?

## ११ शिक्षण आणि स्वातंत्र्यलढा

“ पहा काळ किती बदलला आहे. आणि आतासुद्धा तो आमच्या डोळ्यासमोर बदलत आहे. आज आशियात फार जलद गतीने घटना घडत आहेत. आणि हे प्राचीन खंड जणू काही दीर्घ कालाच्या झोपे-नंतर खडबडून जागे झाले आहे. जगाचे डोळे आता इकडे लागले आहेत. कारण सर्वांना हे माहित आहे की, जगाच्या भवितव्यात आता आशिया खंडाचा फारच मोठा वाटा आहे. ”

१९३१ साली प्रगट झालेले हे जवाहरलालजींचे शब्द आज किती सार्थ आहेत पहा.

१९३० नंतर भारताच्या स्वातंत्र्याची चळवळ प्रखर झाली. सत्या-ग्रह आणि असहकार यांनी सारे भारत राष्ट्र पेटून उठले. गांधीजींच्या कणखर पण संयमी नेतृत्वाने, लोकमान्यांचा व गोखल्यांचा वारसा दूध साखरेसारखा एकजीव करून टाकला. मेणाहून मऊ असलेला हा विष्णुदास भारतीय स्वातंत्र्याला जुलमी भांडवलशाहीच्या घट्ट मगर-मिठीतून सोडविण्याला पुढे ठाकला. जवाहरलालजींसारखे अनेक तरुण सर्वस्वांचा होम करून स्वातंत्र्याच्या लढ्याचे शिपाई बनले.

वयाच्या एकविसाव्या वर्षी म्हणजे १९३८ साली इंदिराजी कॉंग्रेस-च्या रीतसर सभासद झाल्या. आणि त्या कॉंग्रेसच्या चळवळीत भाग घेऊ लागल्या. भारतीय स्वातंत्र्याची चळवळ दिवसेंदिवस तीव्र रूप धारण करू लागली; नेहरु घराण्याचा त्याग, सर्वस्वाचा होम आणि जवाहरलालजींचा देशासाठी वेचलेला जीवनातील सर्वस्व अर्पणाचा भाव थोड्याच काळात त्यांना गांधीजींच्या चळवळीत मानाचे स्थान देऊन गेला.

१९२८ साली ब्रिटिश सरकारचे भारतमंत्री लॉर्ड बर्कनहेड यांच्या

सांगण्यावरून मोतीलालजींनी तयार केलेला नेहरू रिपोर्ट प्रत्यक्ष त्यांच्या मुलाने म्हणजे जवाहरलालजींनी १९२९ साली हा रिपोर्ट स्वतः रावी नदीच्या पाण्यात बुडविला. आणि लाहोर कॉंग्रेसच्या अध्यक्षपदावरून स्वातंत्र्याची घोषणा केली. त्यावेळी इंदीराजी बारा वर्षांच्या होत्या. पण जवाहरांचे हिऱ्यासारखे चकाकणारे स्वयंपूर्ण जीवन सतत तिच्या डोळ्यांपुढे चमकत होते.

त्या शांतिनिकेतनमध्ये शिकत असतानाच दुसऱ्या महायुद्धाचे नगारे झडू लागले आणि पुढील शिक्षणासाठीं त्यांना ऑक्सफर्ड विद्यापीठांत ठेवण्यात आले. शांतिनिकेतनच्या त्या काव्यमय, शांत वातावरणाचा परिणाम त्यांच्या जीवनावर झाला. त्या वेळी ऐन तारुण्याच्या उंबरठ्यावर त्या होत्या व ह्या उंबरठ्यावर असतानाच संपूर्ण स्वातंत्र्य जेथे नांदते आहे. त्या इंग्लडमध्ये शिकण्याची त्यांना संधी लाभली.

## १२ तारुण्य आणि प्रेम

ज्या भूमीत अमर नाटके लिहिणारा शेक्सपीअर जन्मला त्या भूमिवर तारुण्याने मुसमुसलेल्या प्रियदर्शनी इंदिरेचे एकाकी जीवन एका तरुणाच्या दर्शनाने फुलून निघाले. तो तरुणही भारतीय होता. प्रेम आणि अभ्यास यात नेहमी प्रेमात प्रगती होते आणि...

इंदिरेचे ज्याच्यावर प्रेम बसले होते त्याचे नाव होते फिरोज गांधी. आणि याच काळात त्या आपल्या भावी आयुष्याचे सुख-स्वप्न पाहू लागल्या. महायुद्धाच्या उलाढाली युरोपात सुरू झाल्या होत्या. वणव्यासारखे ते भडकू लागले होते. इंदिरा आणि फिरोज पुन्हा भारतात आले. गांधीजींनी वैय्यक्तीक सत्याग्रह सुरू केला. जवाहरलालजींना शिक्षा झाली. पुढे हा सत्याग्रह थांबला पण राजकीय परिस्थिती अधिकच

बिघडत गेली. आणि अशा या अस्थिर राजकीय पार्श्वभूमीवर इंदिरा-नेहरू इंदिरा गांधी झाल्या. फेब्रुवारी १९४२ ला त्यांचा विवाह झाला. पण राजकारणात पडणाऱ्या तरुणांचा विवाह व्यक्तीगत सौख्याचा होम करूनच बहुधा साजरा होत असावा, कारण विवाह झाल्याबरोबर लगेच त्यांना अलाहाबादला भरलेल्या काँग्रेस महासमितीच्या अधिवेशनाच्या तयारीत भाग घेण्यासाठी जावे लागले.

## १३ अधिवेशनाची जबाबदारी

या अधिवेशनाची व्यवस्था फिरोज गांधी यांचेकडेच होती. गांधी पतीपत्नींनी अर्थातच या अधिवेशनाची व्यवस्था चोख ठेवली होती. जणू प्रेम आणि कर्तव्य हातात हात घालून वावरत होते. अधिवेशन संपले. थोडा एकांत मिळाला तेव्हा दोघेही पुन्हा प्रेमाच्य साम्राज्यात रममाण होण्यासाठी आणि जणू पूर्वजांच्या प्रदेशाचे दर्शन घेण्यासाठी इंदिरा आपल्या पतिसह काश्मिरमध्ये गेली. पण तेथे फार काळ तिला रहाता आले नाही. ज्याप्रमाणे आनंद भुवनांत तिला फार काळ राहता आले नाही – त्याच प्रमाणे तिच्या भुवनात, तिच्या जीवनात आनंद फार काळ कधीच टिकला नाही. व्यक्तीगत जीवनाच्या सुखाची वलये, सामाजिक जीवनाच्या हालचालींमुळे केव्हाच हवेत विरून जातात. आत्ताही तसेच झाले. काश्मिरच्या सुंदर, काव्यमय निसर्गाच्या सहवासात साकार झालेल्या तरुण प्रेमाला जास्त काळ सहवास लाभला नाही. मुंबईत काँग्रेसची महत्वाची बैठक भरण्याचे ठरले, आणि दोघांनाही त्यात भाग घेण्यासाठी काश्मिरच्या काव्यमय भूमीचा मोठ्या व्यथित अंतःकरणाने निरोप घ्यावा लागला. त्यावेळी त्या तरुण मनांना – प्रियदर्शिनी इंदिरेला काय बरे वाटले असेल?

## २४ बेचाळीसची मुंबई कॉंग्रेस आणि तुरुंगवास

" तुझे पत्र मिळाले ... तू वाचनालयात जाऊन अनेक पुस्तके वाचली आहेस व आणखी पुस्तके तू वाचू इच्छीत आहेस, आणि त्यासाठी दोन चार पुस्तकांची नावे ... मी सूचित करावीत असे तू म्हणतोस ......... ... नैनी जेलमधून जी काही मदत मला करता येणे शक्य आहे ती मी करीन. कधी कधी मला वाटते की, तुझा शारिरीक आणि मानसिक विकास फारच झपाट्याने होत आहे. मला सारखे राहून राहून वाटते की अशा वेळी मी तुझ्याजवळ असतो तर ... ... ... "

जवाहरलालजींनी आपल्या प्रियदर्शिनी इंदिरेला ह्या ३५ वर्षापूर्वी लिहिलेल्या पत्रातील ओळी आहेत. आपल्या लाडक्या लेकीची त्यांना किती काळजी होती हे यावरून सिद्ध होते. त्या वेळी ते मधून मधून तरी आपल्या प्रिय मुलीला भेटत, जेलचा अडसर दूर होताच! पण आता त्यांच्या मनातील ही इच्छा त्रिमूर्ति बंगाल्याच्या परिसरात घोटाळणाऱ्या त्यांच्या आत्म्याबरोबर वावरत असेल काय? असली तर निश्चितच त्यांच्या आत्म्याला मोठा आनंद झाला असेल की आज आपली प्रियदर्शिनी भारताची पंतप्रधान झाली आहे. लोकशाहीचा डांगोरा पिटणाऱ्या पाश्चात्य राष्ट्रांना पुन्हा एकदा इंदिरेची निवड करून त्यांच्या लोकशाहीच्या पोकळ वल्गनांना भारताने सडेतोड उत्तर दिले आहे.

पण इंदिरेला लाभलेले हे पंतप्रधानपद केवळ ती जवाहरलालजींची कन्या आहे म्हणून लाभलेले नाही. त्यासाठी तिने आपले आयुष्य खर्च केले आहे. गेली सत्तावीस–अठ्ठावीस वर्षे ती कॉंग्रेसची एकनिष्ट सभासद आहे. दोन तपांची ही तपश्चर्या जणू पंतप्रधानकीच्या निवडीने फळाला आली आहे.

काश्मिरमधून फिरोज आणि इंदिरा मुंबई कॉंग्रेसच्या बैठकीला आले. गेली वीस पंचवीस वर्षे सत्याग्रह, असहकार आणि अहिंसा हे त्रिशूळ गांधीजींनी साम्राज्यशाही विरुद्ध वापरले होते पण अत्याचार, कत्तल, हिंदुमुस्लीमातील वैमनस्य, जातीयतेचा विषारी प्रचार या अनेकविध वाममार्गाचा उपयोग करून ब्रिटिशांनी भारतीय स्वातंत्र्याच्या फोफावणाऱ्या वृक्षाची खच्ची चालविली होती, पण जसजशी खच्ची होत होती तसतशी या स्वातंत्र्य वृक्षाची अधिकच जोमाने वाढ होत होती.

मुंबईला बेचाळीस साली झालेल्या या बैठकीत गांधीजीसुद्धा चिडले. ते ब्रिटिशांना म्हणाले 'चले जाव' आणि पुन्हाः साम्राज्यशाहीची जगण्यासाठी धडपड सुरु झाली. कॉंग्रेसच्या मोठमोठ्या पुढाऱ्यांना अटक झाली. फिरोज गांधी भूमिगत झाले. पण थोड्याच दिवसात त्यांना पकडण्यात आले. इंदिरागांधींनाही पकडण्यात आले. स्वातंत्र्यासाठी त्यांनी हसत हसत कारावास पत्करला. त्यांना तेरा महिन्याची शिक्षा झाली. पण जिच्या वडिलांचे उभे तारुण्य जेलमध्ये देशासाठी खर्ची पडले ती इंदिरा तेरा महिन्याच्या शिक्षेला घाबरली असेल काय ?

## १५　सत्तेचाळीसचें स्वातंत्र्य आणि नंतर

लाडके इंदिरे, तू जीवनाच्या दाराशी उभी आहेस. दुःख आणि उदासिनता या गोष्टींशी तुला तसे पाहिले तर काही संबंध नाही तुला जीवनाचा आणि जीवनामध्ये निर्माण होणाऱ्या प्रत्येक गोष्टीचा सामना प्रसन्न आणि शांत चित्ताने करावा लागेल. निर्माण होणाऱ्या अडचणीचे स्वागत तुला करावे लागेल म्हणजे मग आपोआपच तू त्यांच्यावर विजय प्राप्त करून आनंद मिळवू शकशील...

१५४५८ ग्रा. क.



बरं येतो आता. प्रिय इंदिरे, आम्हाला नेहेमी आशावादी राहिलं पाहिजे म्हणजे मग सफलता मिळायला फारसा काळ लागत नाही......"

जवाहरलालजींचे अनेक वर्षांपूर्वीचे हे शब्द पुन्हा एकदा त्यांची आठवण करून देतात. त्यांची आपल्या कार्यावर निष्ठा होती. कॉंग्रेसवर भक्ती होती. इंदिरेचे सुद्धा तसेच आहे. आणि म्हणूनच त्या काळी आपल्या पतीबरोबर...आपल्या वडिलांबरोबर तिने बेचाळीसच्या चळवळीत भाग घेतला होता. बेचाळीसच्या देशव्यापी उठावाचा ब्रिटिश सरकारवर योग्य तोच परिणाम झाला आणि गांधीजींच्या चले

जाव घोषणेची तयारी ब्रिटिशांनी सुरू केली. त्यांनी आपला गाशा गुंडाळण्याच्या अगोदर निर्माण करता येतील तितक्या कटकटी मोठ्या मुत्सदेगिरीने सुरू केल्या. पुढाऱ्यात वाटाघाटी सुरू झाल्या. जाता जाता देशाचे दोन तुकडे करून मौंट बॅटनने लाल किल्ल्यावर स्वतंत्र भारताचा झेंडा १५ ऑगस्ट १९४७ ला फडकविला. भारत स्वतंत्र झाला.

फाळणीचे गालबोट स्वातंत्र्याच्या मुखचंद्रमाला लागले. देशासाठी सोसलेल्या हालअपेष्टांची जाणीव ठेवून जनता जनार्दनाने जवाहरलालजींना स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान केले. इंदिरा गांधीचा सारा वेळ आता पिताजींकडे लक्ष देण्यात जाऊ लागला, फाळणीचे भयानक परिणाम स्पष्ट होऊ लागले. जातीय दंगलींनी ठिकठिकाणी पेट घेतला. हजारो निर्वासीत अब्रूचे धिंडवडे मिरवीत अश्रूंच्या गंगायमुना स्वातंत्र्य सागराला मिळवीत पाकिस्तानातून भारतात येऊ लागले. त्या निर्वासितांना धीर देऊन त्यांच्या पुनर्वसनाचे काम करण्यात इंदिरा गांधी यांनी पुढाकार घेतला. त्यासाठी त्या अहोरात्र झटू लागल्या. आणि अशा वेळी आणखी एक महाभयानक संकट देशावर कोसळले, अहिंसेचा कैवारी अखेर हिंसेची शिकार झाला ! मानवतेचे पुजारी गांधीजी एक दिवस आमच्यातून नाहीसे झाले !

त्यांच्या मरणाने पुन्हा आणखी एकदा देशाच्या जीवनात खळबळ माजली. त्यांच्या मृत्यूचे भांडवल करून नको त्यांनी नाही ते केले, सामान्य जनता ह्या साऱ्या घडत असलेल्या घटनांनी भांबावून गेली होती. अशा वेळी जवाहरलालजींनी देशाचे भलतीकडे भरकटणारे विचार पुन्हा एकदा आपल्या नेतृत्वाने राष्ट्र उभारणीसाठी एकत्र सांधण्याचा प्रयत्न केला. इंदिराजी तेव्हा आपल्या एकाकी कणखर, चिडखोर, पित्याला मातेच्या मायेने सांभाळीत होत्या, पंडितजी कामाचा व्याप वाढवीत होते. देशउभारणीसाठी त्यांनी देशात, परदेशात दौरे

काढले. त्या निमित्त त्यांच्याकडे मोठेमोठे पाहुणे येत. या सर्व गोष्टींची व्यवस्था इंदिराजी चोख ठेवीत.

जवाहरलालजींचा आपल्या प्रियदर्शिनीवर खरोखरच विश्वास होता. म्हणूनच ते अनेक वेळेला त्यांचा सल्ला घेत असत.

" येथे मला कोणी जबाब विचारणारा नाही, कोणी उत्तेजन देणारा नाही. म्हणून मी येथे जरा आळसतो. जर आपण बरोबर असतो तर ही गोष्ट न घडती. मग अशा वेळी मी आणि तू विचारविनिमय केला असता......

जवाहरलालजींची आपल्या मुलीविषयीची ही निष्ठा होती. हे पत्र जेव्हा लिहिले तेव्हा ते जेलमध्ये होते आणि इंदिराजी शिकत होत्या. पण पित्याचा हा विश्वास त्यांनी पुढील आयुष्यात निश्चित तडीस नेला. आणि म्हणूनच जवाहरलालना राष्ट्राचे तारू हाकारता आले.

## १६ केरळांतील कामगिरी

राष्ट्र उभारणीचे कार्य सुरू होते. पण इकडे स्वातंत्र्य लढ्यात जवाहरलालजींबरोबर खांद्यासखांदा लावून लढलेले एकेक सहकारी काळ त्यांच्यापासून हिराऊन नेत होता. मौलाना आझाद गेले, रफी अहमद किडवाई गेले, पंडितपंत गेले, पोलाद पुरुष सरदार वल्लभभाई पटेल गेले. राजेन्द्रप्रसाद गेले. आणि या एकेकाच्या मृत्युसरशी पंडितजींचे जणू सहकार्य अस्त पावत होते. पुन्हाः एवढ्या तोलामोलाची माणसे– वेळ प्रसंगी पंडितजींना रोखठोक सांगणारी माणसे जसजशी कमी होऊ लागली तसतशी पंडितजींची असहायता संपूर्णपणे इंदिरेवर केंद्रित झाली व अशा वेळी देशात अनेक गुंतागुंतीचे प्रश्न निर्माण झाले. गोव्याचा प्रश्न, नागा लॅण्डचा प्रश्न, द्विभाषिक मुंबईचा प्रश्न,

बेळगाव सीमावादाचा प्रश्न, केरळमधील कम्युनिस्टांचा प्रश्न असे अनेकविध प्रश्न नेहरूपुढे दत्त म्हणून उभे होते.

केरळात कम्युनिस्ट राजवट सुरू झालेली होती. महाराष्ट्रात संयुक्त महाराष्ट्र समितीने प्रचंड आंदोलन संयुक्त महाराष्ट्रासाठी सुरु केले होते. अशा वेळी आपल्या पित्याच्या सल्ल्याने इंदिराजींना कॉंग्रेसच्या राजकारणात प्रत्यक्ष काम करण्याचा निर्णय घेतला. १९५५ साली त्या कॉंग्रेस कार्यकारिणीच्या सभासद झाल्या. त्यांनी प्रत्यक्ष केरळमधील कम्युनिष्टांचा अभ्यास केला व तेथील जनमनाची सत्य परिस्थिती त्यांनी जवाहरलालजींच्या व राष्ट्रपतींच्या कानावर घातली. आणि अखेरीस त्यांच्या प्रयत्नामुळे केरळात कम्युनिस्टांची राजवट नष्ट होऊन राष्ट्रपतींची राजवट स्थापन झाली. नंतर केरळमध्ये कम्युनिस्ट विरोधी इतर पक्षांची संयुक्त आघाडी उभारण्यात त्यांनी यश मिळविले. केरळचे अतिगुंतागुंतीचे राजकारण त्यांनी यशस्वी केल्यामुळे कॉंग्रेसश्रेष्ठींच्या वर्तुळात त्यांना मानाचे स्थान प्राप्त झाले, आणि या परिश्रमाचे गोड फळ म्हणून १९५९ साली नागपूरला भरणाऱ्या कॉंग्रेस अधिवेनाच्या अध्यक्षपदाची माळ त्यांच्या गळ्यात पडली.

## १७ महाराष्ट्राचा दौरा

द्वैभाषिक मुंबईराज्याचा प्रश्न भयंकरच चिघळला होता. महाराष्ट्रात संयुक्त महाराष्ट्र समितीच्या झेंड्याखाली झाडून सारे विरोधी पक्ष जवळ जवळ एकत्र आले होते व कॉंग्रेस महाराष्ट्रात अप्रिय होऊ लागली होती. अशा वेळी पुन्हा एकदा १९५९ सालच्या ऑक्टोबर महिन्यात इंदिरा गांधीनी महाराष्ट्राचा पांच दिवसाचा दौरा काढला होता. सातारा, कऱ्हाड, कोयना, कोल्हापूर, इचलकरंजी, सांगली, तासगाव, मंगळवेढा,

कुर्डुवाडी, सोलापूर, पुणे, संगमनेर, श्रीरामपूर, कोपरगाव, नाशिक, मुंबई इत्यादी सोळा ठिकाणी त्यांनी हजारो लोकांच्या उपस्थितीत काँग्रेसचे संयुक्त महाराष्ट्रासंबंधी बदलत असलेले विचार कथन केले आणि त्याचप्रमाणे त्यांनी निर्भिडपणे आपले अनेकविषयांवरील विचार व्यक्त केले होते.

अकरा ऑक्टोबर १९५९ ला सकाळी साडेपाच वाजता त्या मुंबई-हून पॅसेंजरने पुण्याला आल्या होत्या. स्टेशनवर शहर काँग्रेसतर्फे हार घालून त्यांचे पुणे स्टेशनवर स्वागत करण्यात आले होते. नंतर त्या स्पेशल मोटारीने फलटणला रवाना झाल्या होत्या. तेथे दिलेल्या जाहीर भाषणात त्या म्हणाल्या होत्या,

" महाराष्ट्रात आल्यावर मला नेहमीच समाधान व स्फूर्ति मिळते. येथील जनतेच्या इच्छा समजावून घेण्यासाठी मी आले आहे. "

संयुक्त महाराष्ट्राच्या त्यावेळच्या ज्वलंत प्रश्नाबद्दल त्या म्हणाल्या होत्या,

" या प्रश्नाबद्दल पूर्वी एक निर्णय घेण्यात आला होता. परिस्थिती निवळताच आम्ही या प्रश्नाचा फेरविचार करण्याचे ठरविले आहे. त्यासाठी एक समिति नेमली आहे. जास्तीत जास्त लोकांचे समाधान होईल असा पर्याय शोधून काढण्याचा आमचा उद्देश आहे. "

आपल्या भाषणात त्या म्हणाल्या कीं, " माझ्या दौऱ्यात लोक आपल्या अडचणी व तक्रारी मांडतात ही गोष्ट चांगली आहे. लोक जागृतीचे ते लक्षण आहे. गरिबी व बेकारी हे आज देशापुढील मुख्य प्रश्न आहेत, ते सोडविण्यासाठी लोकांचे सहकार्य हवे आहे. सहकारी व सामुदायिक शेती हा हे प्रश्न सोडविण्याचा एक मार्ग " फलटणला मुधोजी हायस्कूलमध्ये चहापान झाल्यावर त्यांनी श्रीराम सहकारी साखर कारखान्याला भेट दिली होती.

याच जाहीर सभेत त्यांना फलटण तालुक्यातर्फे १५२०३ रुपयांची थैली अर्पण करण्यात आली होती.

साताऱ्च्या गांधी मैदानावर सभा झाली. दसऱ्याचा दिवस होता. सातारा S. T. स्टँडजवळ बांधण्यात येणाऱ्या कॉंग्रेस भवनचा कोनशिला समारंभ त्यांच्या हस्ते झाला. त्यांच्याबरोबर त्यावेळच्या मुंबई राज्याचे मुख्य मंत्री यशवंतराव चव्हाण हजर होते. त्यांनी समारंभानंतर साताऱ्च्या छत्रपति शिवाजी कॉलेजला भेट दिली होती. त्यावेळी त्यांनी रयत शिक्षण संस्थेच्या कार्याचा गौरव केला होता. त्यानंतर श्रीमंत छत्रपति सुमित्रा राणी साहेबांनी अदालत राजवाड्यात त्यांना अल्पोपहार दिला होता. त्यानंतर गांधी मैदानावरील आपल्या जाहीर भाषणात त्या म्हणाल्या होत्या, “स्वातंत्र्य प्राप्तीनंतर सुबत्तेसाठी आपण श्रम करावयाचे ही जाणीव लोकांत नाही. ती होणे जरुरीचे आहे. आज कॉंग्रेसचे कार्यक्रम लोकांपुढे योग्य रीतीने येत नाहीत हा मोठा दोष आहे.”

श्री यशवंतराव चव्हाणांनी आभार मानताना विजयादशमीची प्रथा म्हणून सौ. इंदिरा गांधींना सोने दिले. ते म्हणाले, “महाराष्ट्रात सोने नाही पण हृदयाची श्रीमंती आहे व त्याचेच हे प्रतिक आहे.” त्यानंतर त्या कऱ्हाडला गेल्या होत्या.

कऱ्हाड शिवाजी हाऊसिंग सोसायटीच्या जागेत व्याख्यानासाठी पाऊस पडत असताही १०-१२ हजार लोक जमले होते.

तेव्हा यशवंतराव चव्हाण म्हणाले होते, महाराष्ट्राचे हृदय समजण्यासाठी त्या मातृहृदयाने महाराष्ट्रात प्रवेश करीत आहेत.

उत्तर देताना इंदिरा गांधी म्हणाल्या, “जनतेत उत्साह आहे, फक्त योग्य मार्गदर्शनाची जरूरी आहे. शिकवण आणि विचारशक्तीची

जरूरी आहे. आपल्यापुढे भरपूर काम आहे. ते फक्त सरकार करू शकणार नाही. आपली आपणच उन्नति करून घेतली पाहिजे, त्याच बरोबर देशातील गरीब जनता व बालकांना विकासाची सर्व संधि मिळाली पाहिजे."

नंतर त्या सांगलीला रवाना झाल्या होत्या.

सांगलीला १३ ऑक्टो ५९ रोजी आंबराई बागेत स्त्रियांच्या मेळाव्यात भारतीय काँग्रेसच्या अध्यक्ष सौ. इंदिरा गांधींचे दुपारी ४ वाजता भाषण झाले होते. सुमारे १५ स्त्रिया हजर होत्या. बागेच्या हिरवळीवर त्या जमल्या होत्या.

तेव्हा इंदिरा गांधी म्हणाल्या, "आपला इतिहास पहाता राज्यशासन लढाईचे प्रसंग, आंदोलने, सभा संमेलने साहित्य सेवा याबाबतीत स्त्रीचे नाव चमकले आहे पण सर्व साधारण स्त्री अद्याप अज्ञानीच आहे. तिच्या हक्काची जाणीव तिला नाही. सर्व सामान्य स्त्री जेव्हा सुशिक्षित होईल, तिला देश-समाज यांची जाणीव होईल तेव्हाच राष्ट्राची प्रगति होईल."

सांगलीच्या विलिंग्डन कॉलेजच्या विद्यार्थ्यांसमोरसुद्धा त्यांचे भाषण झाले होते. कोपरगावी त्यांना २१ हजाराची थैली अर्पण करण्यात आली होती.

महाराष्ट्राचा दौरा संपवून त्या दिल्लीला गेल्या महाराष्ट्रांतील जनतेची रास्त बाजू त्यांनी पंडितजींना पटवून दिली होती. आणि अखेरीस नेहरूंच्या निर्णयानंतर लोकसभेने मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेला संमति दिली होती.

## १८ जवाहरलालजींचा ७० वा वाढदिवस व केनेडी भेट

५९ साली १४ नोव्हेंबर तारखेला नेहरूंचा सत्तरावा वाढदिवस आला होता. साऱ्या जगातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत होते. त्या वेळी नेहरूंनी आपला वाढदिवस डेहराडूनला साजरा केला होता. दिल्लीहून खास विमानाने जवाहरलालजींबरोबर त्यांची प्रियदर्शिनी इंदिरातर होतीच शिवाय सौ. चन्द्र लेखा मेहता आणि पश्चिम बंगालच्या त्या वेळच्या गव्हर्नर कु. पद्मजा नायडूही हजर होत्या. या वरून राजकारणाच्या व्यापातून वेळ काढून त्या आपल्या पित्याची कशी काळजी घेत होत्या तेच प्रत्ययास येते.

"कोणी सांगू शकत नाही की काय होणार आहे ते. भविष्याच्या पोटात काय दडले आहे हे कोणी सांगू शकत नाही. आज आम्ही पहातो आहोत की जगात दोन उलट-सुलट प्रवाह वहात आहेत हे दोनही प्रवाह प्रतिद्वंद्वी व परस्पर विरोधी आहेत. एक प्रवाह सहकार्य आणि समजदारी यांचा असून उन्नती आणि संस्कृतीच्या निर्माण कार्याकडे वहात आहे. दुसरा प्रवाह विनाशकारी-प्रत्येक वस्तूची मोडतोड करणारा आणि मानवजातीच्या आत्महत्येला कारणीभूत होणारा आहे. दोन्ही उत्तरोत्तर तीव्र गतीने वहात आहेत. दोन्हीही शास्त्र आणि यंत्र यांचा उपयोग करीत आहेत. दोघात जय कोणाचा होणार ?....... "

तेहतीस साली जो प्रश्न नेहरूंना पडला होता तो आज अधिकच बिकट झाला आहे. जगाचे राजकरण अत्यंत चित्रपट गतीने घडत आहे. जगाच्या शांततेचे कैवारी अमेरिकेचे केनेडी, रशियाचे ख्रुचेव्ह, भारताचे जवाहरलाल कल्पना येणार नाही इतक्या नाट्यमय रीतीने जगाच्या राजकारणातून दूर दूर निघून गेले. जगापुढील प्रश्न न मिटता दिवसे दिवस अधिकच अक्राळ विक्राळ रूप धारण करू लागले आहेत.

१९६१ साली नेहरू नोव्हेंबर महिन्यात अमेरिकेला गेले होते. बहुतेक परदेशच्या दौऱ्यात इंदिरा गांधी नेहरूंच्या बरोबर नेहमीच असत. या वेळीही त्या त्यांच्याबरोबर होत्या. त्यावेळी जागतिक शांततेचे पुरस्कर्ते केनेडी डेमोक्रॅटिक पक्षातर्फे अध्यक्षपदावर निवडून आले होते. ६ नोव्हेंबरला त्यावेळी वॉशिंग्टनमध्ये केनेडींना नेहरू भेटले होते आणि इंदिराजींच्या आग्रहामुळे श्रीमती जॅकेलिन केनेडी भारताला भेट द्यावयास आल्या होत्या.



अमेरिकेचे अध्यक्ष जॉन्सन यांच्या पत्नी मिसेस् जॉन्सन यांच्यासमवेत श्रीमती इंदिरा गांधी १९६१.

## १९ वैवाहिक जीवताची सांगता

मुलीने पार्शी पोराशी लग्न लावू नये असे पंडितजींचे प्रामाणिक मत होते. पण प्रेमाचा कैफ काही और असतो. आपल्या प्रियकरापुढे सारे जग तुच्छ वाटते! इंदिरा व फिरोज हेही त्यास अपवाद नव्हते. त्यांचे हृदय विरघळण्यास चार वर्षे लागली. १९४४ ते १९४६ सालीं इंदिरेस राजू व संजू ह्या जोडीचा लाभ झाला. नातू होताच मुलावरचा किंवा मुलीवरचा राग पार नाहीसा होतो हे जागतिक सत्य आहे. राजीव व संजीव या नातवांनी नेहरूंच्या एकलेपणात त्यांना फारच मदत केली आहे. नेहरू ह्या दोघांना एकदम पाठीवर घेऊन घोडा-घोडाही खेळले. घसरगुंडीमध्ये स्वतःही ते अनेकवार आपटले. इंदिरा व फिरोजचे पुढे पुढे पटेनासे झाले स्वातंत्र्योत्तरकाळच्या एका तापाच्या आतच इंदिरेचा संसार उद्ध्वस्त झाला. उत्साही मेननसाहेबांनी दोघांचे पुनर्मिलन व्हावे यासाठी खूप प्रयत्न केले. सासऱ्याचा वरचष्मा फिरोजला आवडेनासा झाला. फिरोजवर नेहरूंचा गुप्त राग त्यामुळे इंदिरेला दोघांच्याही तालावर नाचावे लागे! दोघांनी एकमेकांना ५८ सालीं सांगितले की आपले मार्ग भिन्न आहेत. हे दोन्ही रुळांचे फाटे एकत्र येणे अशक्य आहे! १९६० साली हृदयाचा झटका आला व त्यातच फिरोजचा अंत झाला. त्याचवेळेस आपण 'एकटे' आहोत याची इंदिरेला जाणीव झाली. सांसरिक यातना विसरण्यासाठी मोठ्या माणसाजवळ एकच रामबाण औषध असते, ते म्हणजे सामाजिक कार्य. आणि या कार्यांत इंदिरा आता जास्तीत जास्त लक्ष घालू लागली.

## २० राजकारणापासून दूर

राजकारणापासून शक्यतो दूर रहाण्याचा इंदिराजींनी सतत प्रयत्न केला आहे. पण राजकारणाने सतत त्यांना आपल्याकडे ओढण्याचा

प्रयत्न केला आहे. ६४ सालच्या फेब्रुवारी महिन्यातील गोष्ट. उत्तर-प्रदेशातील लोकसभेच्या महामसुद मतदारसंघाची जागा रिकामी झाली होती तेव्हा महामसुद तालुका काँग्रेसचे चिटणीस श्रीकृष्ण आगरवाल यांनी त्यांना त्या मतदार संघातून उभे रहाण्याची विनंती केली होती पण इंदिरा गांधींनी ती नाकारली होती. त्या वेळी आगरवाल म्हणाले होते, " श्रीमती इंदिरा गांधींनी पाठविलेल्या पत्रात कोणत्याही पोट निवडणुकीत उभे रहाण्याचा आपला मानस नाही असे कळविले आहे. "

## २१ नेहरूनंतर कोण

जानेवारी ६४ ची गोष्ट. जवाहरलाल नेहरू आजारी पडले होते. इंदिरा त्यांची मनःपूर्वक सेवा करीत होती. पण दिल्लीच्या राजकीय वर्तुळात त्या वेळी एकच चर्चा सुरू झाली होती. नेहरूनंतर कोण?

त्या वेळी मुरारजी देसाई, लालबहादूर शास्त्री व इंदिरा गांधी ही नावे काँग्रेस श्रेष्ठींच्या पुढे होती. त्या वेळी सुद्धा कामराजांचा व बऱ्याच मुख्यमंत्र्यांचा पाठिंबा नुकत्याच झालेल्या काँग्रेस कार्यकारिणीच्या निवडणुकीत इंदिराजींना मिळून त्यांना सर्वात जास्त मते मिळाली होती. त्या वेळीच त्यांची लोकप्रियता कसास लागली होती.

नेहरूंचा आजार जसजसा वाढत होता तसतसा पंतप्रधान कोण होणार हा विचारही राजकीय वर्तुळात अधिक चर्चिला जात होता. नेहरूंच्या मृत्यूच्या अगोदर काही दिवसच म्हणजे १९ मे १९६४ ला अखेरीस पत्रकारांनी पंडित नेहरूंना हा प्रश्न विचारलाच तेव्हा ते म्हणाले होते, इंदिरा गांधी आपल्या जागेवर येण्याची शक्यता नाही व आपण त्यांना त्या जागेसाठी निश्चितच तयार करीत नाही.

आपला वारसा निवडण्याचे लोकांवर सोपविणे सर्वात उत्तम होय. साहाजिकच आमच्या नजिकच्या वर्तुळातून लोक कोणाची तरी निवड करतील.

## २२ लाल बहादूर शास्त्री

आणि झालेही तसेच. काँग्रेसश्रेष्ठींच्या पुढे जी तीन नावे होती त्यातून शास्त्रींचे अबोल व्यक्तीत्व प्रखर देशभक्ती, संपूर्ण साधू वृत्ती, अलौकिक त्याग, खंबीर नेतृत्व, कणखर राष्ट्रनिष्ठा आणि देशाच्या स्वाभिमानाची मुरगळलेली मान हिंमतीने सावरण्याचे नेतृत्व भारताला फक्त काही महिनेच लाभले हे भारताचे दुर्दैव होय !

## २३ ६४ चा प्रजासत्ताक दिन

शास्त्रींच्या निवडीपूर्वीची गोष्ट आहे. नेहरू तेव्हा हयात होते. १९६४ चा तो प्रजासत्ताक दिनाचा सोहळा होता. इंदिराजी नेहरूंबरोबर तो सोहळा पहाण्यासाठी त्रिमुर्ती बंगल्यातून बाहर पडल्या. भुवनेश्वरच्या आजारानंतर नेहरू प्रथमच जाहीर कार्यक्रमास हजर रहात होते. काळ्या रंगाच्या ब्यूक गाडीत ते बसले होते. अनेक लोक त्यांना पहाण्यासाठी कार्यक्रमाच्या जागी जमले होते. संरक्षणमंत्री यशवंतराव चव्हाण त्यांना सामोरे गेले होते. नेहरूंच्या चेहऱ्यावर सूज स्पष्टपणे दिसत होती. त्यांचा डावा डोळा निस्तेज भासत होता. गेल्या ३० वर्षात पडली नव्हती अशी थंडी दिल्लीत पडली होती. गार वारा वहात होता. तरीही नेहरू दोन तास प्रजासत्ताक दिनाची परेड व इतर कार्यक्रम पहात होते. जणू त्यांना तो सोहळा पुन्हा पहाण्यास मिळणार

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत



नव्हता याची खरोखर खात्री पटली असावी. म्हणूनच शरीर व्याधींची पर्वा न करता ते प्राण डोळ्यात आणून तो सोहळा पहात होते. परेड संपल्यावर ते उठले. सेवातत्पर प्रियदर्शिनी पित्याच्या बाजूलाच बसली होती. नेहरूंच्या वेदना तिला जाणवल्या. तिने क्षणाचाही विलंब न लावता त्यांना आधार दिला.

'म्हाताऱ्याच्या ह्या काठीने' त्याला सावरले. जवळच लॉर्ड मौंटबॅटन बसले होते तेही उठले. त्यांनी नेहरूंना आधार दिला व दोघांनी मिळून नेहरूंना गाडीत नेऊन बसविले.

## २४ इंदिराजी व शास्त्रीजी

इंदिरा गांधी यांच्याबद्दलच्या शास्त्रीजींच्या भावना अशाच उत्कट होत्या. फक्त एकोणीस महिन्यापूर्वी सेंट्रल हॉलमध्ये पंडितजींना श्रद्धांजलि वाहताना शास्त्रीजींच्या भावना उचंबळून आल्या व त्यांच्या डोळ्यावाटे अश्रु वाहू लागले, कंठ रुद्ध झाला तो इंदिरा गांधी यांच्या आठवणीने. त्यांना हे कळत होते की ज्या नेत्याच्या छत्राखाली आपण वाढलो, मोठे झालो त्याचा वियोग जर आपल्याला एवढा दुस्सह होत आहे तर जिने उभ्या जन्मभर आपल्या अलौकिक पित्याच्या सेवेसाठी साऱ्या सुखसर्वस्वाचा त्याग केला केला, प्रत्यक्ष आपल्या पतीचा विरहसुद्धा सोसला, त्या इंदिराजींना पित्याचे छत्र हिरावून घेतले गेल्यामुळे केवढ्या दारुण यातना होत असतील. म्हणून प्रधान-मंत्रिमंत्रिपद स्वीकारताच शास्त्रीजींनी ज्या एका व्यक्तीचा स्वतःला विसर पडू दिला नाही ती व्यक्ति म्हणजे इंदिरा हीच होय. त्यांनी आग्रहपूर्वक इंदिरा गांधी यांना मंत्रिमंडळात घेतले आणि पंडितजींच्या प्रियदर्शिनी कन्येवर आपलीहि मायेची पाखर घातली. नेहरूंच्या

निधनानंतर इंदिरा गांधी यांनी स्वतः मात्र आपले नाव पुढे येऊ दिले नाही; उलट शास्त्रींच्या एकमुखी निवडीला त्यांनी प्रभावी रीतीने पाठिंबा दिला. एकमताने ही निवड करण्याची सूचना पुढे येताच त्यांनी आपल्या साऱ्या संबंधितांना शास्त्रीजींच्या बाजूलाच ओढून आणले आणि अशा रीतीने मोरारजी देसाई यांची बाजू दुबळी केली. बिजू पटनाईक, द्वारकाप्रसाद मिश्र यांनी ऐनवेळी मोरारजी देसाई यांच्यामागील पाठिंबा काढून घेतला तो इंदिरा गांधी यांच्यामुळेच होय. त्याहिपेक्षा धोक्याचा असा कावा कम्युनिस्ट व त्यांच सहप्रवासी यांनी त्यावेळी रचला होता आणि ते इंदिरा गांधी यांचे नाव शास्त्रीजींच्या विरुद्ध पुढे आणू पहात होते. पण इंदिरा गांधी यांनी शास्त्रीजींना उघड पाठिंबा देऊन त्यांचेही कारस्थान फोल ठरविले.

इंदिरा गांधी यांनी त्यावेळी आणि त्यानंतरच्या एकोणीस महिन्यांच्या काळात जी मुत्सद्दगिरी दाखविली जो संगम प्रगट केला, त्यामुळे शास्त्रीजी वा कॉंग्रेसचे इतर नेते वा मंत्रिमंडळातील त्यांचे सहकारी या सर्वांच्याच सदिच्छा त्यांना प्राप्त झाल्या. या मुत्सद्दगिरीच्या अभावी प्रथमपासूनच मोरारजी देसाई अलग पडले, विजयालक्ष्मी पंडित यांना शरणागति पत्करावी लागली.

## २५ कर्तृत्वाची ओळख

कॉंग्रेसमध्ये आणि कॉंग्रेसबाहेरील अनेक संस्थांवर त्यांनी काम केले. १९५९ मध्य नागपूरला भरलेल्या कॉंग्रेस अधिवेशनाच्या त्या अध्यक्ष होत्या म्हणज १९५९–६० साली त्या कॉंग्रेस अध्यक्ष होत्या. कॉंग्रेस वर्किंग कमिटीच्या आणि ए. आय. सी. सी.च्या त्या सभासद होत्या १९३५ साली ए. आय. सी. सी. ( अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटी )



च्या महिला विभागाच्या त्या अध्यक्ष झाल्या. तसेच ए. आय. सी. सी. च्या मध्यवर्ती निवडणूक समितीच्या आणि सेंट्रल पार्लमेंटरी बोर्डाच्या त्या सभासद होत्या. तसेच अनक कल्याण संघटनांच्याही त्या सभासद होत्या. काँग्रेस वर्किंग कमिटीच्या सभासदांची नेमणूक निवडणूक पद्धतीने व्हावी असे जेव्हा ठरले, तेव्हा श्रीमती इंदिरा गांधींना सर्वात अधिक मते पडली हाती. तसेच त्या काँग्रेस अध्यक्ष असताना अनेक बाबतीत यशाचे माप काँग्रेसच्या पदरात पडल होते.

सामाजिक कार्य आणि चळवळ हो जणू काही त्यांच्या अगवळणी लहानपणापासून पडल्यासारखी आहे. पुण्यात काही दिवस शाळेत शिकत असताना गलिच्छ वस्तीतून, हरिजनात आणि महात्मा गांधींच्या सामाजिक विकासकार्यात त्यांनी कार्य केलेले आहे.

पंडित नेहरू पंतप्रधान असताना श्रीमतो इंदिरा गांधी या आपल्या

पित्याच्या घरातील मुख्य यजमानीणबाई (होस्टेस) असत. परंतु ते काम सांभाळूनाहि मुलांच्या विकासकार्याकडे त्या खूपच लक्ष पुरवीत. त्यांनी स्थापिलेल्या ' बालसहयोग ' संस्थेच्या त्या अध्यक्ष होत्या. त्या ठिकाणी उनाड अगर विनापालक मुलांची जोपासना होते. अलाहाबाद जिल्ह्यातील ग्रामीण स्त्रिया आणि मुले यांच्यासाठी उभारलेल्या कमला नेहरू विद्यालयाच्याही त्या अध्यक्ष होत्या. तसेच निरनिराळ्या ठिकाणी विखुरलेल्या बालभवन रिक्रिएशन सेंटर्सचे अध्यक्षपदही त्यांचेकडे होते. बालविकासासाठी स्थापिलेल्या आंतरराष्ट्रीय सघटनेच्या ( इंटर नॅशनल युनियन फॉर चाईल्ड वेल्फेअर ) उपाध्यक्ष आणि भारतीय बालविकास मंडळाच्या त्या अध्यक्ष होत्या. मध्यवर्ती सामाजिक विकास मंडळ, अखिल भारतीय हस्तव्यवसाय मंडळ या संस्थांशीहि त्यांचा निकटचा संबंध आहे. अनेक मानवी भूतदया आणि सांस्कृतिक संघटनांच्या त्या विश्वस्त म्हणून काम करतात. स्वराज्य भवन विश्वस्त मडळ, राष्ट्रीय बालक संस्था, कमला नेहरू स्मारक हॉस्पिटल अशा अलाहाबादमधील अनेक प्रमुख संस्थांच्या कार्यकारी मंडळातही त्यांना काम करावे लागते. राष्ट्रीय संघटना समिती– ( नॅशनल इंटिग्रेशन कमिटी ) च्या त्या अध्यक्ष होत्या. यूनोस्कोच्या कार्यकारिणीच्या त्या सभासद होत्या. आपल्या राष्ट्रावर चीनचा हल्ला झाला असताना आणि देश आणीबाणीच्या प्रसंगात गुरफटला गेला असताना श्रीमती इंदिरा गांधींनी आघाडीला भेटी दिल्या, तेथे लढणाऱ्या जवानांच्या सुखसोईकडे लक्ष पुरविले आणि अविश्रांत श्रम वेचले. नागरिक केंद्र मंडळाचे चेअरमनपद त्यांनी भूषविले आहे. राष्ट्रीय संरक्षण प्रयत्नांनाही त्यांनी खूपच साहाय्य दिले. मध्यवर्ती शिक्षण सल्लागार मंडळ, गिर्यारोहक संस्था याचे सभासदत्व, परदेशी विद्यार्थी असोसिएशन, चिल्ड्रेन्स लिटल थिएटर यांचे विश्वस्तपद त्यांचेकडे होते.



नेहरूंनी इंदिरेस सांगितलेली शेवटची कामगिरी म्हणजे न्यूयॉर्क येथे भरलेल्या जागतिक यात्रेची उपस्थिति.

न्यूयॉर्क येथे ह्या जत्रेचे उद्घाटन अध्यक्ष लिंडन जॉनसन यांनी २२ एप्रिल १९६२ रोजी केले अमेरिकेचे परराष्ट्रीय धोरण विशद करण्याची ही संधि अमेरिकन अध्यक्ष कां सोडणार होते?

आंतरराष्ट्रीय सभा व परिषदा येथे कशा पद्धतीने बोलावे हे तंत्र इंदिरेने पिताजींकडून फार छान हस्तगत केले आहे. याबाबतीत ही लेक आत्याबाईच्यावर वरताण करते. प्रसन्न व सुस्मित व्यक्तिमत्वाने तिने जत्रेचे वातावरण केव्हाच मोहित करून टाकले. आपल्या भाषणातील आशावादी आतषबाजीने तिने तर अध्यक्ष लिंडन जॉनसन यांना देखील गार करून सोडले.

तिने पहिलाच टोला जॉनसनला लगावला. “ आम्हा सर्वांना जागतिक शांततेची जरूर आहे, पण ती शांतता आपणांस क्रियात्मक पाहिजे; झोपाळू, मरगळलेली, मृत शांतता आम्हांस नको. आम्हास युद्ध नको. क्रियाशील शांतता हवी. शांततेस काही अर्थ हवा. नाहीतर आमची प्रगति होणार तरी कशी ? एका राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्रास मदत केली पाहिजे. राष्ट्राराष्ट्रातील सहकार ही शांततेची पूर्वतयारी आहे. त्यासच मी क्रियावान् व प्रगतिशील शांतता म्हणते. ” भारतीय प्रतिनिधीने इतकी परिणामकारक सुरुवात करताच जाणत्यांनीही माना डोलावल्या.

नेहरूंच्या मृत्युनंतर त्यांच्या एकुलत्या एक कन्येस शास्त्री विसरले नाहीत. इंदिरेस माहिती व नभोवाणी खाते देण्यात आले.

दुःखी इंदिरेस हे खाते देऊन शास्त्रीजींनी फार मोठी कामगिरी केली. थोडे दिवस गेले. दुःखही हलके झाले. इंदिरा हळूहळू बाहेर हिंडूफिरू लागली. हळूच शास्त्रीजींनी तिची मध्यवर्ती मंत्रिमंडळाच्या ‘ इमर्जन्सी समिती ’ वर नेमणूक केली. या समितींत शास्त्री चव्हाण, कृष्णम्माचारी, नंदा, सुब्रह्मण्यम्, व इंदिरा एवढी मंडळी होती.

नेहरूंच्या निधनानंतर इंदिरेची ठळक कामगिरी म्हणजे लंडनमधील राष्ट्रकुलसंघाच्या मुख्य मंत्र्यांच्या बैठकीस तिने दिलेली हजेरी. महामंत्री श्री. शास्त्रीच त्या वेळी जावयाचे पण आकस्मिक आजारी पडल्याने त्यांनी श्रीमती इंदिरा गांधी व कृष्णम्माचारी यांच्यावर ती कामगिरी सोपविली.

शास्त्रीबुवांनी पुनश्च इंदिरेवर एक नाजुक कामगिरी सोपविली. ऑक्टोबरच्या अखेरीस इंदिरा थंडी व भीती या दोघांनी कापत मॉस्को

नगरीत दाखल झाली. तिने कोसिजिन या नव्या पंतप्रधानाजवळच मुलाखत मागितली. आणि काय आश्चर्य ! हा नवा पंतप्रधानच इंदिरेने जिंकून टाकला–राजकीय दृष्ट्या. " तुम्ही घाबरू नका. " कोसिजिनने सांगितले ख्रुश्चोव्हला आम्ही काढले ते आमच्या लाथाळीमुळे. भारतास त्याने प्रचंड मदत दिली म्हणून नाही. ख्रुश्चोव्हने भारताशीं जी मैत्री संपादन केली ती अखंडच राहणार आहे. आमची लष्करी वा इतर मदत आम्ही तशीच चालू ठेवणार आहोत. चीन वा पाकिस्तान यांच्याशीं आमचे संबंध आहेत तसेच आहेत. तुम्ही घाबरू नका, उलट आम्ही तुमची मदत वाढविणार आहोत. " काश्मीरप्रश्नावरही रशिया धोरण बदलणार नाही असेंही कोसिजिनने इंदिरेस आश्वासन दिलें.

इंदिरा मोठ्या समाधानाने नव्या दिल्लीत परतली. कोसिजिनने तिला पूर्णपणे आश्वासन दिले होते.

" रशियनांनी आमची बाजू बळकट करण्याचे आश्वासन दिले आहे." नंतरची इंदिरेची मोठी कामगिरी म्हणजे पंडितजींच्या व्ही. ओ. ए. च्या ( Voice of America ) भिजत्या घोंगड्याच्या प्रकरणाचा निकाल लावणे. डिसेंबर १४ रोजी तिने लोकसभेत २ शॉर्ट वेव्हवरील केंद्रें व १ मिडियम वेव्हवरील केंद्र प्रस्थापित करण्याचा निर्णय जाहीर केला. मध्यम लहरीचे केंद्र फारच जोरदार आहे व लघु लहरींची केंद्रे २५० किलोवॅट् शक्तीची आहेत हे तिने सांगितलें. ह्या केंद्रांमुळे चिनी व पाकिस्तानी प्रचारास बराच आळा बसेल अशी आशा तिने व्यक्त केली. तिबेट, सिक्कीम व भूतान या उत्तरेकडील देशांसाठी व बर्मा, थायलँड, मलेशिया व लघुलहरींच्या अशतः इंडो-चायना या पूर्वेकडील देशांना या केंद्राचा उपयोग होणार आहे. मध्यम लहरींच्या केंद्राचा उपयोग पाकिस्तान, अफगाणिस्तान, सौदी अरेबिया व आफ्रिका यांच्यासाठी होणार आहे. " नुसत्या विरोधी

प्रचारास आळा बसावा हे नकारात्मक धोरण भारताचे नाही; तर भारताच्या धोरणाची सुस्पष्ट कल्पना या राष्ट्रांना यावी ह्या प्रयत्नांत भारतीय आकाशवाणी आहे, असे तिने जाहीर केलें.

ऑगस्ट १९६५ मध्ये भारत व पाकिस्तान यांच्यात युद्ध सुरू झाले महामंत्री व संरक्षणमंत्री यांच्याबरोबरच इंदिरेवरही प्रचाराची फार मोठी जबाबदारी येऊन पडली. चीनच्या हल्ल्याच्या वेळीं व शेख अब्दुल्लांच्या हाज यात्रेच्या वेळी भारत सरकार खूप शहाणपण शिकले होतें. टीकाकार अजूनही बरीच टीका करतात की भारतीय प्रचार योग्य नव्हता. पण. ब्रिटन व अमेरिकेने मुद्दामच डोळे बांधून घेतले त्याला इंदिरा काय करणार ?

## ३६ गुणांचा गौरव

१९५३ साली त्यांना अमेरिकेने ठेवलेले मातृपारितोषिक मिळाले होते, तर १९६० साली येल (Yale) विद्यापीठाचे ‘ हॉलंड मेमोरिअल प्राईज ’ मिळाले होते.

श्रीमती इंदिरा गांधी यांना शिक्षणाप्रमाणेच कलेविषयीही खूप आस्था आहे. अनेक नृत्य आणि संगीत संस्थांशी त्यांचा संबंध आहे. प्रजासत्ताक दिनी नेहमी जे निरनिराळे सांस्कृतिक देखावे करून परेडमध्ये मिरविण्यात येतात ते सुरू करण्याबद्दल त्या पुष्कळांशी जबाबदार आहेत.

१४६५ साली इटालित स्थापन झालेल्या रोमन अॅकॅडमीकडून त्यांना असेच एक आंतरराष्ट्रीय पारितोषिक देण्यात आले होते. १७ नामवंत

व्यक्तींनी इझाबेलादेस्ते या आंतरराष्ट्रीय पारितोषिकासाठी त्यांची एकमताने निवड केली होती. त्यांना हे पारितोषिक आंतरराष्ट्रीय मुत्सदेगिरीसाठी देण्यात आले होते. तेव्हा बऱ्याच जणांना ते आश्चर्य वाटले होते. अखेर त्यांना हा प्रश्न विचारला असता त्या म्हणाल्या होत्या, " खरे तर ते थोडे चुकलेच. मुत्सदेगिरीचे हे पारितोषिक नव्हतेच. ते होते आंतरराष्ट्रीय समझोत्यासाठी. त्यासाठी माझी निवड का केली गेली हे मला सांगता येणार नाही. अलिकडेच मी निरनिराळ्या सोव्हिएत नेत्यांस भेटले होते. काही बोलणी केली होती. त्याचा संबंध येथे जोडला असावा.

३७

## नेतेपदी निवड

श्रीमती गांधी यांना ३५५ मते मिळाली व त्यांचे एकमेव प्रतिस्पर्धी उमेदवार श्री. मोरारजी देसाई यांना १६९ मते पडली. म्हणजेच इंदिराजींनी मोरारजींवर १८६ मतांनी मात केली.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर कॉंग्रेस संसदीय पक्षाच्या नेतेपदासाठी झालेली ही पहिलीच निवडणूक होय. संसदभवनाच्या घुमटाकार सेंट्रल हॉलमध्ये सकाळी बरोबर ११-३० वाजता निवडणुकीच्या कामास प्रारंभ झाला.

एकूण ५५१ कॉंग्रेस खासदारांपैकी सर्वात अधिक म्हणजे ५२८ खासदार या बैठकीस हजर होते. कॉंग्रेसचे अध्यक्ष श्री. कामराज अध्यक्षस्थानी होते.

श्रीमती इंदिरा गांधी यांचे नाव श्री. गुलझारीलाल नंदा यांनी सुचविले व श्री. संजीव रेड्डी यांनी त्यास अनुमोदन दिले.

श्री. मोरारजी देसाई यांचे नाव म्हैसूरचे श्री. के. हनुमंतय्या यांनी सुचविले आणि राजस्थानचे श्री. टिकाराम पालीवाल यांनी त्यास अनुमोदन दिले.

श्री. कामराज यांनी सुरुवातीस स्व. पंतप्रधान शास्त्री यांना श्रद्धांजली वाहिली आणि नंतर नेतेपदासाठी नावे सुचविण्यांची विनंती केली.

याप्रसंगी कित्येक राज्यांचे मुख्यमंत्री, राज्यातील इतर मंत्री, प्रमुख काँग्रेस नेते, परदेशी मुत्सद्दी गॅलरीत हजर होते. दूर चित्रवाणीवरूनही हा अविस्मरणीय प्रसंग चित्रित करण्यांत आला. छायाचित्रकारांनी श्रीमती गांधी व मोरारजी देसाई यांची छायाचित्रे सभागृहाबाहेर टिपली.

श्रीमती इंदिरा गांधींनी श्री. नंदा यांच्या समवेत सेंट्रल हॉलमध्ये प्रवेश करताच अनेक खासदारांनी व त्यांच्या चाहत्यांनी त्यांच्याभोवती गर्दी केली तेव्हा त्यांचे अंतःकरण भावनावेगाने भरून आले.

निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर श्रीमती इंदिरा गांधी पक्ष-नेत्याच्या जागी विराजमान झाल्या तेव्हा टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला.

श्री. मोरारजी देसाई यांनी श्रीमती इंदिरा गांधी यांचे सर्वांत प्रथम अभिनंदन केले.

श्री. कामराज म्हणाले की, श्रीमती गांधी यांची पक्षनेत्या आणि पंतप्रधान म्हणून निवड झाली आहे. देश अतिशय कठीण परिस्थितीतून जात आहे. अन्नप्रश्न व आर्थिक प्रश्न सोडवायचे आहेत. देशाची सुरक्षितता कायम राखावयाची आहे. हे प्रश्न समाधानकारकरीत्या सोडविण्यासाठी आपण एकजुटीने आणि सहकार्यांच्या भावनेने काम केले पाहिजे.

## २८ निवडीनंतर

निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यावर मतदारांचे आभार मानून व अभिनंदनाचा स्वीकार करून हिंदीत भाषण करताना श्रीमती इंदिराजी म्हणाल्या, "कामराजजी, नंदाजी, मोरारजी देसाई आणि सहकाऱ्यांनो, माझे हृदय भरून आले असून तुमचे आभार कसे मानावेत तेच मला कळत नाही. आपल्यापुढील अनंत अडचणींची मला जाणीव आहे परंतु त्याचबरोबर आपला देश महान आहे हेही मला माहीत आहे. आता मी तुमच्यासमोर उभी आहे, पण माझे चित्त मात्र लागले आहे. थोर नेत्यांकडे. महात्माजींच्या पायाशी मी लहानाची मोठी झाले त्याशिवाय माझे वडील पंडितजी व लालबहादुर शास्त्री यांचे मला मार्गदर्शन घडले. शास्त्रीजी आणि पंडित पंत यांनी स्वातंत्र्या नंतर मला राजकारणात आणले व मी जेव्हा राजकारणातून निवृत्त होऊ इच्छित होते तेव्हाही राजकारणातच राहण्याचा आग्रह धरला. या नेत्यांनी आपणाला मार्ग दाखविला असून त्याच मार्गाने मी जाऊ इच्छिते.

लालबहादुर शास्त्रींनी तर शांततेकरिता जीवनच वेचले म्हणून आपण शांततेसाठी झटणे आवश्यक आहे. पण त्याचबरोबर देशाला बलाढ्य व सुरक्षित बनविणे जरूर आहे. मी नेहमीच मला देशसेविका समजत आले आहे. माझे पिताजीही स्वत:ला देशसेवक समजत असत."

पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी आपल्या सफदरगंज निवासस्थानी देशी व परदेशी पत्रप्रतिनिधींना मुलाखत दिली. शंभराचेवर पत्रप्रतिनिधी उपस्थित होते.

राष्ट्रपति भवनातून श्रीमति गांधी निवासस्थानी आल्या तेव्हा जम्मू-काश्मीरचे राज्यपाल डॉ. करणसिंग, व काही राज्यांचे मुख्यमंत्री यांनी पुष्पहार घालून त्यांचे अभिनंदन केले. तत्पूर्वी निवासस्थानासमोर

जमलेल्या प्रचंड जनसमुहाने ‘ इंदिरा गांधी की जय ’ अशा घोषणा करून त्यांचे अभिनंदन केले.

आपल्या मुलाखतीत श्रीमती इंदिरा गांधी यांनी जागतिक शांतते-पासून तो दारूबंदीपर्यंत विविध प्रश्नांना अशा आत्मविश्वासाने उत्तरे दिली की त्यांची पत्रकारांवर छाप पडल्याशिवाय राहिली नाही. त्यांच्या उत्तरात खूपच मनमोकळेपणा दिसून आला. अधूनमधून त्यांच्या उत्तरांना विनोदाची किनारही असे. याप्रसंगी स्थूल स्वरूपात उत्तरे देणे त्यांना अपरिहार्य होते. तरीही चालू राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय प्रश्नावरील त्यांचे विचार निश्चित स्वरूपाचे आहेत. याची जाणीव परदेशी पत्रांच्या प्रतिनिधींना झाल्याशिवाय राहिली नाही.

श्रीमती इंदिरा गांधी मुलाखत देताना म्हणाल्या की, अन्न व आर्थिक आघाडीवरील समस्या, सरहद्दीला धोका इत्यादी कारणांमुळे भारताची परिस्थिती बिकट आहे. गतकाळात भारतीय जनतेने भीषण संकटांना तोंड दिले आहे.

## २९ निवडीची प्रतिक्रिया

महाराष्ट्राज्याचे मुख्यमंत्री म्हणाले होते नेतेपदासाठी उमेदवाराचा विचार करताना हायकमांडसमोर श्रीमती इंदिरा गांधी व श्री. यशवंतराव चव्हाण यांची नावे होती. परंतु श्री. मोरारजीभाईंच्या विरोधात कोणाला उभे करावे असा प्रश्न आला, तेव्हा बहुतेक मुख्य-मंत्र्यांनी व खुद्द श्री. चव्हाण यांनी इंदिराबाईंच्या नावास पाठिंबा दिला.

काँग्रेसचे अध्यक्ष श्री. के. कामराज त्यावेळी पत्रकारांशी बोलताना म्हणाले की श्रीमती गांधी उत्कृष्ट कारभारी ठरतील अशी आपणाला खात्री वाटते.

देशापुढील प्रश्नांना तोंड देणे श्रीमती गांधींना अवघड जाईल, असे मत काही लोकांनी व्यक्त केले आहे, याबाबत विचारताना श्री. कामराज म्हणाले, " या प्रश्नांना मोठे स्वरूप देण्याचा काही लोकांचा नेहमी प्रयत्न असतो. देशापुढे प्रश्न नसतील तर, सरकारची काही जरूरी नाही. मला खात्री वाटते. त्यांना आपल्या देशाची माहिती आहे. लोकांच्या भावना व आकांक्षा त्यांना माहीत आहेत. त्या सत्य स्थितीत उतरविण्याचा प्रयत्न करतील. "

इंदिरा गांधींचे धोरण काय राहील, असे विचारताना कामराज म्हणाले, " डावे किंवा उजवे असा प्रश्न नाही. त्या काँग्रेसचे धोरण अंमलात आणण्याचा प्रयत्न करतील. " रशियाचे पंतप्रधान श्री. अलेक्सी कोजिजिन यांनी एक तार पाठवून पंतप्रधान श्रीमती गांधींचे अभिनंदन केले आहे.

" आपण कै. नेहरू व कै. शास्त्री यांचे तटस्थतेचे, शांतता व आंतरराष्ट्रीय सहकार्य बळकट करण्याचे धोरण पुढे चालू ठेवणार, हे ऐकून आम्हास फार आनंद झाला. भारत व पाक यातील ताश्कंद करार याच भावनेतून झाला आहे, " असे तारेत म्हटले आहे.

अमेरिकन काँग्रेस हावाईतील स्त्री सदस्य श्रीमती पॅटसी टी मिंक यांनी अमेरिकेच्या प्रतिनिधीगृहासमोर बोलताना " इंदिरा गांधींची नेतेपदी झालेली निवड सर्व ठिकाणच्या स्त्रियांना अभिमानास्पद आहे. " असे सांगितले.

अमेरिकेत प्रत्येक क्षेत्रात स्त्रिया पुरुषांची बरोबरी करतात. राजकारणात मात्र त्यांना अद्याप तसे करता आले नाही म्हणून भारतासारख्या लोकसंख्येने मोठ्या असलेल्या देशात एक नियोजित स्त्री पंतप्रधान झाल्याबद्दल अमेरिकन महिलांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

ब्रिटनचे पंतप्रधान श्री. हेराल्ड विल्सन व कॉमनवेल्थ सेक्रेटरी श्री. आर्थर बॉटमली यांनी श्रीमती इंदिरा गांधींचे अभिनंदन करणारा संदेश पाठविला आहे. " माझ्या देशाचे हिंदशी पूर्वीसारखेच जवळचे व मित्रत्वाचे संबंध राहतील. आपली भेट पुन्हा लवकरच होईल, अशी आशा मी व्यक्त करतो " असे श्री. विल्सन यांनी म्हटले आहे.

जपानमधील गृहिणी संघाच्या वार्षिक अधिवेशनात एका ठरावान्वये हिंदच्या पंतप्रधानपदी निवडून आल्याबद्दल श्रीमती इंदिरा गांधींचे अभिनंदन करण्यात आले. सदर संघाचे पंचाहत्तर लाख सभासद आहेत.

## ३० मंत्रिमंडळाचा बिकट प्रश्न

निवडून आल्यानंतर त्यांचे सर्वांनी अभिनंदन केले पण त्यांच्या मनापुढे मात्र एकच प्रश्न भेडसावीत होता तो म्हणजे मंत्रिमंडळाचा बिकट प्रश्न !

देशातील आणि पक्षातील निवडक खासदारांचा मंत्रिमंडळात समावेश करणे ही गोष्ट खरोखर बिकट होय. एकाला निवडले तर दुसऱ्याची नाराजी पत्करावी लागणार !

विचारपूर्वक काम करण्याची त्यांना सवय असली तरी मंत्रीमंडळाचे हे बिकट काम फारच जिकीरीचे असल्याची त्यांची खात्री झाली. निरनिराळ्या सहकाऱ्यांशी विचारविनिमय करून त्या अखंड नऊ तास यादी करीत होत्या. अखेरीस श्रीमती इंदिरा गांधी यांनी २४ जानेवारीच्या पहाटेला २-३० वाजता आपल्या मंत्रिमंडळाची यादी तयार केली व २-४५ ती राष्ट्राध्यक्षांना सादर केली. सध्याच्या मंत्रिमंडळात त्यांनी फार मोठे बदल केले नाहीत. बहुतेक प्रमुख मंत्र्यांची सध्याची खाती कायम ठेवली.

राष्ट्रपतींनी श्रीमती गांधी यांना अधिकारपदाची व गुप्ततेची शपथ दिली. त्यावेळी मंत्रिमंडळातील त्यांचे सहकारी, कॉंग्रेस अध्यक्ष, वरिष्ठ अधिकारी आणि श्रीमती गांधी यांच्या कुटुंबातील मंडळी उपस्थित होती.

राष्ट्रपती भवनात जाण्यापूर्वी श्रीमती गांधी या तीन मूर्ति बंगल्यात गेल्या व आपल्या दिवंगत वडिलांच्या प्रतिमेसमोर त्या काही क्षण स्तब्धतेत उभ्या राहिल्या.

शपथविधी समारंभ उंच घुमट असलेल्या अशोक सभागृहात पार पडला. १६ कॅबिनेट मंत्र्यांपैकी १४ मंत्र्यांनी, १८ राज्यमंत्र्यांपैकी १७ जनांनी आणि १७ उपमंत्र्यांपैकी १४ जणांनी सुमारे अर्ध्या तासाच्या अवधीत गटागटाने शपथ घेतली.

शपथविधी समारंभ होण्यापूर्वी नियोजित पंतप्रधानांनी एक महत्व-पूर्ण धोरणविषयक निर्णय घेतला. या निर्णयानुसार कॅबिनेटमधील मंत्र्यांचा अनुक्रम नष्ट करण्यात आला. कॅबिनेट अनुक्रमानुसार श्री. गुलझारीलाल नंदा यांना पंतप्रधानांच्या नंतरचे स्थान असले तरी इतर सर्व मंत्र्यांची नांवे वर्णानुक्रमे घेण्यात आली.

या निर्णयामुळे श्रीमती गांधी यांच्यानंतर श्री नंदा यांचा शपथविधी झाला. इतर मंत्र्यांना वर्णानुक्रमे शपथ देण्यात आली.

नव्या मंत्रिमंडळांचा शपथविधी पार पडल्यानंतर गृहखात्याचे सचीव श्री. एल. पी. सिंग यांनी सर्व राज्य सरकारांना औपचारिकपणे नव्या पंतप्रधानांनी अधिकारपद ग्रहण केल्याचे कळविले. परराष्ट्र मंत्रालयाने परदेशातील सर्व वकिलातींना तसे कळविले.

अधिकारप्रदान पुस्तिकेत मंत्र्यांनी स्वाक्षऱ्या करण्यापूर्वी राष्ट्रपतींनी प्रत्येकाशीं हस्तांदोलन केले. त्यानंतर मंत्रिमंडळाच्या सन्मानार्थ राष्ट्रपतींनी अल्पोपहार दिला.

## ३१ नवे मंत्रीमंडळ

### १६ ज्येष्ठ मंत्री

नव्या मंत्रिमंडळात १६ ज्येष्ठ मंत्री ( कॅबिनेट मिनिस्टर्स ) असून, बहुतेक जुन्या मंत्र्यांची खाती कायम आहेत. श्री. अशोक मेहता, जगजीवनराम, जी. एस्. पाठक व फकरुद्दीन अहमद हे चौघे नवे मंत्री आहेत.

खात्यांची नवी वाटणी पुढीलप्रमाणे करण्यात आली आहे.

श्रीमती इंदिरा गांधी-पंतप्रधान व अणुशक्तिमंत्री.

गुलझारीलाल नंदा— गृह.
स्वर्णसिंग— परराष्ट्र.
यशवंतराव चव्हाण— संरक्षण.
स. का. पाटील— रेल्वे.
सचींद्र चौधरी— अर्थ.
जगजीवनराम— मजूर व रोजगार.
सी. सुब्रह्मण्यम— अन्न, शेती, समाजविकास व सहकार.
सत्यनारायण सिन्हा— संसदीय कामकाज व दळणवळण.
एम्. सी. छगला— शिक्षण.
अशोक मेहता— नियोजन.
डी. संजीवय्या— उद्योगधंदे.
जी. एस्. पाठक—कायदा.
संजीव रेड्डी— वाहतूक, विमानवहातूक, नौकानयन व पर्यटन.
मनुभाई शहा— व्यापार.
फकरुद्दिन अहमद— वीज व पाटबंधारे.

## राज्यमंत्री

जयखुखलाल हाथी— गृहखाते.

ए. एम्. थॉमस— संरक्षण.

दिनेशशिंग— परराष्ट्र.

डॉ. रामसुभगसिंग— रेल्वे.

सी. एम्. पुनाचा–वाहतूक.विमानवहातूक, नौकानयन व पर्यटन

पी. गोविंद मेनन— अन्न व शेती.

विभुदेंद्र मिश्रा— उद्योगधंदे.

बी. आर. भगत— अर्थ.

सी. आर. पट्टाभिरामन— कायदा.

टी. एन्. सिंग— लोखंड व पोलाद.

ओ. व्ही. अलगेसन—पेट्रोलियम व रसायन.

मेहेरचंद खन्ना— बांधकाम व घरबांधणी.

के. रघुरामय्या— तांत्रिक विकास, पुरवठा व सामाजिक सुरक्षा.

डॉ. सुशीला नायर— आरोग्य व कुटुंबियोजन.

राजबहादुर— माहिती व आकाशवाणी.

डॉ. के. एल्. राव— पाटबंधारे व वीज.

जगन्नाथ राव— मजूर, रोजगार व पुनर्वसन.

एस. के. डे.— खाणी व धातू.

## उपमंत्री

श्री. पी. एस. नासकर— गृहखाते.

श्यामधार मिश्रा— संरक्षण.

शामनाथ— रेल्वे.

शहानवाजखान— मजूर, रोजगार व पुनर्वसन.

पी सी. सेठी— लोखंड व पोलाद.
श्रीमती चंद्रशखर— सामाजिक सुरक्षा.
आनंदराव चव्हाण— नियोजन.
भक्तदर्शन— शिक्षण.
बी. एस. मूर्ती— आरोग्य व कुटुंबनियोजन.
अण्णासाहेब शिंदे— अन्न व शेती, समाजविकास, सहकार.
एल. एन. मिश्रा— अर्थ.
व्ही. सी. शुक्ल— संसदीय कामकाज व दळणवळण.
बी. सी. भगवती— बांधकाम व घरबांधणी.
श्रीमती नंदिनी सत्पती— माहिती व आकाशवाणी.
सरदार इक्बालसिंग— पेट्रोलियम व रसायने.



शफी कुरेशी—व्यापार.
श्रीमती सौंदरम रामचंदन— शिक्षण.

मराठी ग्रं... क्र. १५२५४

* श्रीमती इंदिरा गांधी रोज सकाळी आपल्या सफदरजंग रस्त्यावरील निवासस्थानी नागरिकांची ८ ते ९-३० या वेळात भेट होणार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे.

* त्या निवडून आल्यानंतर ५०० सायकल रिक्षावाले मिरवणुकीने त्यांच्या निवासस्थानी आले व त्यांना त्यांनी हार अर्पण केले.

* निवड झाल्यावर दोन दिवसात श्रीमती गांधी यांना मिळालेली मणावरी फुले हॉस्पिटलमधील जखमी सैनिक व अनाथ बालकाश्रमांना पाठविण्यात आली आहेत.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम .............. वि. ..............
क्रमांक .............. नों. दि. ..............



नेतेपदी निवड होण्यापूर्वी त्या सुशील ललितादेवी शास्त्रींचा आशीर्वाद घेत असल्याचे आपणास वरील चित्रात दिसेल.

REFBK-0015254